# गोंडवाना विद्यापिठ, गडचिरोली

## लोकमान्य महाविद्यालय, वरोरा.

# बी.ए. तृतीय वर्ष (सत्र - VI)

# प्रकल्प अहवाल

# सत्र - २०२१ - २२

"वरोरा तालुक्यातील प्राचीन मंदिरे आणि मुर्तीशिल्प – एक अभ्यास"


संशोधक

कु. सुरूची भाऊराव कोंडावार

बी.ए. तृतीय वर्ष

मार्गदर्शक

डॉ. दिपक लोनकर

इतिहास विभाग प्रमुख

लोकमान्य महाविद्यालय, वरोरा.

# अनुक्रमाणिका


1) प्रस्तावना

2) उद्दीष्टये

3) गृहीतके

4) संशोधन पद्धती

5) संदर्भसुची

# प्रस्तावना

मंदीर हे भारतीय संस्कृतीचे एक वैशिष्ट्य असुन मंदीर किंवा देवालय स्थापत्य हे मानवाच्या ऐहिक जिवनातील प्रगती निदर्शक असत. भारतात त्याप्रमाणे गेल्या २००० वर्षात मंदीरे उभारली गेली, त्याचप्रमाणे वरोरा तालुक्यातही अनेक प्राचिन मंदीरे उभारली गेलीत. (साधारणतः २५०० वर्षापासुन). वरोरा तालुक्यातील मंदीरांची प्राचिनता इ. सनाच्या ~~८~~ किंवा ८ च्या किंवा ९ व्या शतकापर्यंत (अँटीक्विटी) मागे नेता येते. हे आपल्याला बालाजी मंदीर (माढेळी, ता. वरोरा), भोंडा महादेव मंदीर (भटाळा ता. वरोरा), ब्रम्ह-विष्णू-महेश मंदीर (खरवड ता. वरोरा), भवानी मंदीर येथील संशोधनातून सिद्ध करता आले आहे.

माढेळीतील प्राचीन मंदीर हे भोसलेकालीन मंदीर आहे असे निदर्शनास येते. हे मंदीर जरी बालाजी मंदीर म्हणून ओळखले जात असले तरी या मंदीरातील विष्णूमुर्तीचे एक वेगळे वैशिष्ट दिसून येते. तसेच खरवड येथील मंदीर प्राचिन हेमाडपंथी मंदीरा-च्या पायावर आधुनिक मंदीर स्थीत आहे. परंतू या मंदीरातील ब्रम्ह-विष्णू-महेशाची या तिन्ही मूर्ती अतिशय प्राचिन आहे. भोंडा महादेव मंदीर हे राष्ट्रकूट राज्याच्या काळातील आहे असे श्रीपादजी चितळे यांनी सांगीतले आहे.

# संशोधनाची उद्दिष्टये

1) वरोरा तालुक्यातील ऐतिहासीक वैभवावर प्रकाश टकाणे

2) वरोरा तालुक्यातील मंदीरे शिवा तेथील शिल्पशास्त्राची माहिती पुढे आणने

3) मंदिरस्थापत्यावशेषांच्या आधारे मंदीरस्थापत्याचा अभ्यास करणे

4) हिंदू मंदीर स्थापत्याचा आढावा घेणे

5) ऐतिहासीक साधनांचे चिकीत्सक संशोधन करणे

6) राष्ट्रकूटकालीन व भोसलेकालीन वरोरा तालुक्यातील धार्मिक महत्व स्पष्ट करणे

7) हिंदू मूर्तीशिल्पांचा शोध घेणे व त्याचा अभ्यास करणे

# गृहीतके

१) राष्ट्रकूट राजांनी व भोसल्यांनी केलेला आश्रय दिल्यामुळे या काळात वरोरा तालुक्यात कला, वास्तुकला व मूर्तिकलेचा विकास झाला.

२) भद्रावती येथे सापडलेल्या ताम्रपटावरून राष्ट्रकूटांनी विदर्भातील प्रदेशावर राज्य केले.

३) राष्ट्रकूट राजांनी व भोसल्यांनी हिंदू मंदिराची निर्मिती केली.

४) वरोरा तालुक्यातील काही भागात हिंदू मूर्तीशिल्पाची निर्मिती केल्या गेली.

# संशोधन पद्धती

" वरोरा तालुक्यातील प्राचिन मंदीरे आणि मूर्तीशिल्प - एक अभ्यास "

या विषयाच्या संशोधनासाठी सर्वेक्षण आणि संदर्भ संशोधन पद्धतीचा उपयोग केला आहे. राष्ट्रकूटकालीन आणि भोसलेकालीन मंदीरे आणि मूर्तीशिल्पांचे आणि संदर्भातील अवशेषांचे ऐतिहासीक दृष्टीकोणातून सर्वेक्षण करण्यात आले आहे. आणि या सर्वेक्षणातून मिळालेल्या 'माहितीच्या' आधारे प्रस्तुत संशोधन पूर्ण केले आहे.

# प्रकरण पहिले

## - बालाजी मंदीर - मार्डा

प्राचिनतेचा आणि आधुनीकतेचा अप्रातिम मेळ असणाऱ्या चंद्रपूर जिल्हयातील, ~~वरोरा~~ वरोरा तालुक्यातील वरोऱ्यावरून ८ km अंतरावर असलेले, वर्धा नदीच्या तिरावर वसलेले गाव मार्डा. वरोरा तालुक्यात अस लोकांना परीचीत असणारे डॅम येथे आहे. परंतू ताम्र युगातील संस्कृतीशी संबंधीत खापरे या गावात मिळाली आहे. यावरून ताम्र युगात मानवी वसाहतींची साक्ष येथे असल्याचे पटते. याच गावात प्राचिनतेचा वारसा जपत असलेले अतिशय प्राचिन बालाजी मंदीर आढळून आले आहे. या मंदीराचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे हे यादवकालीन मंदीर आहे. आणि हे यादवकालीन मंदीर असून मंदीरामध्ये स्थीत असणारी मूर्ती, या मूर्तीचा इतिहास हा वेगळा आहे. या मंदीराची ओळख करतांना बाहेरचा भाग हा नविन बांधला गेला आहे.

### सभामंडप :-

मंदीराच्या थोडे आत गेले असल्यास सभामंडपाच्या कमाणी दिसतील. या प्राचिन मंदीराचा बाह्यांग म्हणजेच मंडप किंवा सभामंडप आठ खांबावर स्थित असल्याचे दिसून आले आहे

हे ८ खांब आणि त्यानंतर मंदीराचे गर्भगृह अशा पद्धतीची मंदीराची रचना दिसून येते. या सभामंड-पाच्या खांबावरुन आणि बाहेरील भाग व गर्भगृह-चा भाग अतिशय प्राचिन आहे हे लक्षात येते.

मंदीराच्या आठ खांबाव्यतीरिक्त -देखील स गर्भगृहाच्या बाह्यांगावर म्हणजेच सभामंड-पाचे ६ दोन खांबाच्या मध्योमध्य असलेले देवकोष्ठ दिसून आले आहे. ज्यात स्त्रीप्रतीमा स्थीत आहे यासिवाय बाजूला गणपतीची मूर्ती आहे.

## गर्भगृह :-

गर्भगृहाच्या प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूला सेविकेच्या स्वरुपात दोन प्रतिमा बाह्यांगावर दिसून येते. गर्भगृहाच्या प्रवेशद्वाराच्या दुसऱ्या बाजूस तशाच पद्धतीचे खांब असून त्यावर नक्षीकाम केलेले दिसून येते. या गर्भगृहाच्या प्रवेशद्वाराच्या दुसऱ्या बाजूस दोन खांबांच्या मध्योमध्य देवकोष्ठ दिसून येते. त्यामध्ये लक्ष्मी आणि विष्णू नागावर झोपलेल्या अवस्थेत आढळून येते. अशाप्रकारची प्राचिन मूर्तीशिल्प देवकोष्ठात स्थीत आहे. अशाप्रकारे गर्भगृहाचा बाह्यांग दिसून येतो. ज्याप्रमाणे मंदीरशास्त्रामध्ये असते त्याप्रमाणे या मंदीराच्या गर्भगृहाच्या प्रवेशद्वारावरती गणपतीची मूर्ती स्थीत आहे. गर्भागृहाचा भाग प्राचीन असून गर्भगृहाचे बांधकाम अतिशय साधे दिसून येते. तेथे कुठलेही नक्षीकाम दिसून येत नाही. ज्याप्रमाणे मंदीर शास्त्रामध्ये दिसून येते त्याप्रमाणे गर्भगृहाचा वरचा भाग दिसून येते.

## गर्भगृहातील मूर्ती :-

मार्डी या गावातील मनगटे यांचे या मंदीराची सेवा करतात जवळपास सात पीढ्यांपासुन या मंदीराच्या सेवेचे हे कुटुंब करत आहे. याच कुटुंबातील त्यांच्या पूर्वजांच्या स्वप्नामध्ये दृष्टांत दिला गेला की या मंदीराच्या मागच्या भागात जी गढी आहे त्या गढीमध्ये मी आहे. अशा दृष्टांतामुळे मागच्या भागातील गढीमध्ये खोदकाम करुन ती मूर्ती काढल्या गेली आणि ते मंदीर आधीच तिथे स्थित होते. आणि त्या मंदीरामध्ये मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. हा मार्डी येथील बालाजी मंदीरातल मूर्तीचा इतिहास आहे.

बालाजी मंदीर म्हणून हे मंदीर ओळखल्या जाते परंतू इतिहास तज्ञांचे म्हणजे श्रीपादजी चितळे यांचे म्हणणे आहे की या मंदीरातील मूर्ती ही बालाजीची मूर्ती नसून ती विठ्ठलाची मूर्ती आहे आणि त्याचे त्यांनी लेखाणाच्या स्वरुपात जे विश्लेषन आहे ते विश्लेषन मांडण्याचा प्रयत्न केला आहे. येथील मूर्ती बालाजीची का नाही आणि विठ्ठलाची मूर्ती का? असे श्रीपादजी चितळे यांनी पुराव्यानिशीच सिद्ध केले आहे ते अतिशय महत्वाचे आहे.

या मंदीरामध्ये स्थित असणारी मूर्ती तिथे पहीले नव्हती परंतू सद्यास्थितीत हे मंदीर बालाजी देवस्थान म्हणून ओळखले जाते. परंतू या मंदीरामध्ये असणाऱ्या मूर्तीची ओळख श्रीपादजी चितळे या अभ्यासकाने केली आहे आहे आणि त्यांचे म्हणने आहे की " ही विठ्ठलाची मूर्ती आहे " ही मूर्ती

कुशापद्धतीने ओळखता येऊ शकते याबद्दल त्यांनी सांगितले आहे. मूर्तीच्या एका बाजूला शंख व दुसऱ्या बाजूस गदा दिसून येते. म्हणजेच श्रीदेवी आणि भूदेवी अशा दोन्ही प्रतिमा या मूर्तीच्या बाजूला दिसून येते. आणि महत्वाचे म्हणजे जे मूर्तीचे मुकुट आहे ते या काळात चांदीचे बसविले आहे. डोळेही आता बसविले आहे याशिवाय श्रीपाद चितळे यांनी या मूर्तीचे वेगळे वर्णन केले आहे. की या मूर्तीला मिश्या आहे. आणि विठ्ठलाच्या मूर्तीला मिशा असत नाही. त्या ब्रह्माच्या असता-त. परंतू विठ्ठलाला मिशा नसते. परंतू त्यांनी हाही खुलासा केला आहे की नंतरच्या काळात म्हणजेच पंधरावा किंवा सोळाव्या शतकात ज्या मूर्ती विठ्ठलाच्या बनल्या तितपर्यंतच्या काळात विठ्ठला मिशा देण्याची मूर्तिशास्त्रामध्ये एक पद्धत होऊन गेली होती. आणि त्याच काळातील ही मूर्ती असावी असा श्रीपादजी चितळे यांचा निष्कर्ष आहे. हे नाविन्यपूर्ण इतिहास सांगणारे प्राचिन मंदिर आहे.

# प्रकरण दुसरे

## - ब्रम्ह - विष्णु - महेश मंदीर -
## - खरवड

खरवड हे गाव वरोरा तालुक्यात असुन, वरोऱ्यापासुन १५ km अंतरावर आहे. खरवड गावात जाण्यासाठी नागपूर - चंद्रपूर मार्गावर ब्राम्हणी फाट्यापासुन १२ km अंतरावर आहे. खरवड या गावाचा उल्लेख प्राचिन इतिहासामध्ये दिसुन येतो. याच गावामध्ये भोसलेकालीन किंवा मराठ्यांच्या काळातल्या किल्ल्याचा उल्लेख इतिहासामध्ये आढळतो. त्यादृष्टीने हे गाव अतिशय महत्वाचे दिसुन येते. ऐतिहासीकदृष्ट्या अतिशय महत्वाच्या या गावातील वैशिष्ट्य म्हणजे इथे असणारे ब्रम्ह - विष्णू - महेश मंदीर हे होय. चंद्रपूर जिल्ह्यात अतिशय दुर्मीळ असे मंदीर इथे दिसुन येते. चंद्रपूर जिल्ह्यात फक्त दोनच मंदीरे, एक घानोरा आणि दुसरे म्हणजे खरवड ही ब्रम्ह - विष्णू - महेशाची मंदीरे आपल्याला दिसुन येते. त्यामुळे मंदीर स्थापत्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे असणारे हे मंदीर खरवड येथे दिसुन येते. १८६७ मध्ये कुझीन्स ने जो अहवाल प्रसिद्ध केला किंवा कनींगहम याने ऑर्किओलॉजीकल सर्वे ऑफ इंडिया

या १८६४-६५ मध्ये सादर केलेल्या अहवालामध्ये ज्या विदर्भातील ६२ गावांचा जिथे मंदीर स्थापीत आहे अशा गावांचा उल्लेख केला आहे. यामध्ये चंद्रपूर जिल्ह्यातील 27 गावांचा उल्लेख आहे. जिथे हेमांडपंथी मंदीरांचा ~~अल~~ उल्लेख आपल्याला मिळेल. या २७ गावांमध्ये हेमांडपथी मंदीर अस्तीत्वात असल्याचा उल्लेख १८९७ मध्ये आणि १८८४ मध्ये असलेला लक्षात येते यावरुन खरवड या गावामध्ये त्या काळात एक हेमांडपथी मंदीर स्थीत होते हे लक्षात येते. त्याच हेमांडपथी मंदीराच्या पायावर आजचे आधुनिक मंदीर खरवड येथे स्थित आहे, आणि या आधुनिक मंदीरामध्ये जी मूर्ती आहे ही अतिशय प्राचिन आणि मूर्तीशास्त्राचा आणि स्थापत्यशास्त्राचा उत्तम नमुना महाराष्ट्रभर प्रसिद्ध होउ शकेल अशी प्राचिन मूर्ती या मंदीरामध्ये स्थापीत आहे.

## प्राचिन मूर्ती शिल्प -

### 1) ब्रम्ह मूर्ती :-

ब्रम्ह मूर्तीच्या वरील भागात प्रभामंडळ असुन त्यात मकरमुख हत्ती, अश्व, बैल, मेंढा इ. लघुशिल्प दिसून येते. ब्रम्हाच्या उत्पती गुणांचे प्रतिक म्हणजे हे प्राणि होय. ही प्रतिमा चतुर्भुज असुन चारही हातात प्रदक्षीणा क्रमाने बघीतले तर वरद मुद्रा, अक्षमाळा, कमंडलु व पोथी या

वस्त्र शिल्पात कोरलेल्या दिसतात. चतुर्मुख ब्रम्हाची ही मूर्ती मुखावर टोकदार, दाढी आणि आकडेबाज मिशा, बाजूबंद, यज्ञोपवीत, कुंडी, नेसूचे वस्त्र प्रतिमेवर करंडक पद्धतीचा मुकुट याव्यतिरिक्त तोडे, शेला हे सर्व अलंकार या मूर्तीशिल्पात अतिशय नजाकतीने कोरलेले आहे.

## विष्णू मूर्ती :-

विष्णूची प्रतिमा ही स्थानक अवस्थेत म्हणजेच उभी असुन चतुर्भुज आहे. शंख, चक्र, गदा, पद्म या क्रमामुळे ही प्रतिमा गोविंद प्रतिमा ठरते. या मूर्तीच्या पाठशिळेवर दशावतार, मत्स्य, वराह, नरसींह, श्रीराम, श्रीकृष्ण, परशुराम यांचे अंकण मानवी उत्क्रांती दर्शवितात. मूर्तीच्या कानात मकरकुंडले असुन गळ्यात वैजंतीमाळा, यज्ञोपवीत, मुकुट, कटिपट्ट, उदरबंध, केयूर, तोडे, कडा हे सर्व प्रस्तरशिल्पांत कोरलेले दिसून आले आहे.

## महेश मूर्ती :-

खरवड येथील महेशाची मूर्ती रौद्र भावातील आहे. भालावर तिसरा क्रोध नेत्र आहे. तसेच शिव मुकुट नागबंधयुक्त आहे. ही प्रतिमासुद्धा चतुर्भुज आहे. अक्षमाळा, नागपाश, त्रीमुखी नाग आणि फळ धारण केलेले दिसते. शिवाचा अलंकार म्हणजे रुद्राक्ष त्यामुळे शिल्पात रुद्राक्षमाळा आहेतच

याचे अलंकार या प्रतिमेवर ठळकपणे कोरलेले दिसते. मूर्तिवर खांद्यापर्यंत लोंबलेले कानातील मकरकुंडले, वक्षस्थळ, रुळलेला रुंद पदक असलेल्या माळा, शरीरावर यज्ञोपवीत, हातात रुद्राक्षमाळेची बाजूबंद व कडे तसेच कमरेभोवती अर्धवस्त्र घातलेले आढळून येते. या अधोवस्त्रावर नखला व स्तनाचे अंकन आहे. शिवाच्या शरीरावरील वृक्षाची नम्रता त्यांच्या निऱ्या व गुडघ्यापर्यंत आलेला सोग याचे अंकन शिल्पकाराने अति मनोहारी शैलीत कोरलेले आढळून येते. प्रतिमेच्या गुडघ्यापर्यंत रुळणारी वर्णमाला तसेच पायात तोडे घातलेले आढळतात.

या तिन्ही मुर्त्यांच्या बाजूला अर्धस्तंभ असून त्यावर विविध देवतांचे देवकोष्ठ दिसून येते. प्रत्येक प्रतिमेच्या पायाशी चामरधारिणी भक्त, सेवक व सेविका दिसतात. या तिन्ही मूर्त्यांची उंची ५ फुटापेक्षा जास्त आहे. या तिन्ही मूर्त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव प्रत्येक त्या देवतेच्या गुणांचे निर्देशक वाटते. या तिन्ही मुर्त्यांच्या प्रभामंडळात आपल्याला लहान लहान देवकोष्ठ दिसून येते. या तिन्ही प्रतिमा नखशिखांत शिल्पाकृतीने नटलेल्या आहे. टाका कलाकाराने हे घडविलेले प्रस्तर काव्य वाटावे इतके सौंदर्य खरवड येथील शिल्प प्रतिमांचे आहे. इतिहास संशोधक श्रीपदजी चितळे यांनी या प्रतिमेला 'सौंदर्याचा मुकुटमणी' म्हटले आहे. या मूर्तीप्रमाणे म्हणजेच टाकाच शिल्पात कोरलेल्या मूर्ती या कुठेही आढळून येत नाही.

१९७१ मध्ये खरवड येथील शिल्पात कोरलेल्या ब्रम्ह - विष्णू - महेश या तिन्ही मूर्ती एक करोड रुपयास मागितल्या होत्या. पुर्वी या मूर्ती आज जेवढ्या स्पष्ट आहे. तेवढ्या १९७१ च्या काळात स्पष्ट नव्हत्या परंतू एका इटालीयन लेडीने तिथे रासायनीक पावडरने या मूर्त्या साफ केल्या आहे. त्यामुळे या मूर्त्या आज स्पष्टपणे दिसतात. काळाच्या ओघात मूर्तीच्या काही गोष्टी खराब झाल्या आहे. मंदीराच्या गाभाऱ्यात या सुंदर मूर्तीतील विष्णूचे हात भंग झाल्याने गाभाऱ्यात नविन मूर्तीची स्थापना करण्यात आली आहे.

प्राचिन हेमाडपंथी मंदीराच्या भक्कम पायावर आणि खांबावर आताचे आधुनिक मंदीर उभे आहे. प्रकाराचे प्राचिन काम अजुनही याच मंदीराच्या दक्षिण बाजूस एक उपमंदीर आहे जेथे एक शिवपींड स्थापीत आहे. याच शिवाच्या उपमंदीराच्या बाहेरील देवकोष्ठकात दोन शिल्प प्रतिमा दिसून येतात. यातील एक गरुडारुढ लक्ष्मीनारायन ललीतासनात आलींगन मुद्रेत आहेत; आणि दुसऱ्या देवकोष्ठकातही अशाचप्रकारची मूर्ती आढळेल परंतू या मूर्तीची काळाच्या ओघात ओळखता येत नाही. शिवाय पादपीठावर मूर्तीवरही स्त्री- पुरुष प्रतिमा आहे. हेही ओळखता येत नाही. याव्यतिरिक्त या शिवमंदीराच्या बाहेर डाव्या बाजूला एका ओट्यावर ब्रम्हेशान जनार्दन मूर्ती, गणेश मूर्त्या, हरीहर प्रतिमा, स्त्री प्रतिमा ठेवल्या आहे. यामध्ये ब्रम्हेशान जनार्दन मूर्ती ही विशेष लक्ष वेधून घेणारी आहे. मुख्य मंदीराच्या बाजूला आणि मागे आपल्या प्रदक्षिणा मार्गाने अनुक्रमे लाल वालुकाष्मात अर्धभुजेची

दिनांक ..................

(कौशल्यम् बलम्)

पान नं. ..................

पायाशी पाच भरवाचे मंकुण असणारी सुर्यप्रति-मो प्रेतासनावर नृत्य करणारी नृत्य चामुंडा आणि पुढे नृत्यभैरविची मूर्ती दिसते

हेमाडपंथी मंदीराच्या पूर्वेस गावाच्या बाहेर जात असताने एक तलाव आढळतो. या तलावावर एका मंदीराचे अवशेष दिसून आले आहे मोठा काळा दगड त्यावर पंचारय पद्धतीची रचना असलेल्या या मंदीरावर कुठलेही अलंकरण नाही. ढासळलेल्या अवस्थेतील एक छोटे मंदीर बांधावयास मिळते.

श्री.प्र.संस्था

# प्रकरण तिसरे

## - शिवमंदीर - भटाळा

भटाळा या गावाला दगडांचे गाव, शिताफळांचे गाव, शिंगाळयांचे गाव आणि आदिमानवाची वस्ती असणारा पारंपारीक किंवा प्राचिन संस्कृतीची ओळख करून देणारे गाव असे संबोधण्यात येते.

भटाळा या गावाचे वैशिष्ट्य म्हणजे प्राचिन काळापासुन आदीमानवाच्या संस्कृतीपासून तर अकराव्या किंवा बाराव्या शतकापर्यंत आणि त्यानंतरही आपल्या वैभवशाली इतिहासाची साद सोडणारे वैभव उत्तम आहे. भटाळा या गावाचे नाव कसे पडले त्याबाबत इतिहास अभ्यासक श्रीपादजी चितळे यांनी भटाळा या गावाच्या संदर्भात भटाळा हे नाव कसे पडले तर त्याबद्दलची एक विल्पत्ती मांडली आहे. भद्राळा आणि भद्राळाचे अपभ्रंश होउन भटाळा गाव किंवा नाव आत्तापर्यंतच्या इतिहासात आले असा निष्कर्ष त्यांनी मांडला.

भटाळा येथील मंदीर विदर्भात प्रसिद्ध असलेले महादेवाचे मंदीर तसेच त्यास भोंडा महादेव मंदीर असे म्हणतात. चंद्रपूर जिल्ह्यातील इतर शिवमंदीरे जर बघीतले तर त्यातूलनेत या मंदीराचे एक वैशिष्ट्य आहे. म्हणजे की चंद्रपूर जिल्ह्यातील

इतर शिवमंदीरे जर बघीतले तर त्यातुलनेत या इतर शिवमंदीरांची निर्मीती प्रक्रीया दिसून येत नाही. हे एकमेव असे मंदीर की जे चंद्रपूर जिल्ह्या -मध्ये दिसेल की जे वैशिष्ट्यपूर्ण आहे. यासंबंधीचा महत्वाचा भाग तज्ञांकडून येतो. ग्वाल्हेर येथील तेलीका मंदीर जे आहे त्या मंदीराची रचना या भोंडा महादेव मंदीर भटाळा या रचनेशी मिळती-जुळती आहे. परंतू तेलीका मंदीरामध्ये जी कलाकृती आहे तशी कलाकृती भोंडा महादेव मंदीरावर दिसत नाही. अतिशय साधी कलाकृती किंवा साधे बांधकाम मंदीराच्या खालच्या भागावर दिसते. फक्त कळसाचा जो भाग आहे तिथून बारीक नक्षीकाम दिसून येते.

## स्तंभ :-

दर्शनी भागातील स्तंभांचा विचार केल्यास त्यांच्या खालच्या भागात एक दोन्ही हात जोडून असणारी मूर्ती शिल्प दिसून आले. दोन्ही हात जोडून एखादी मूर्ती दिसत असेल तर ती कदाचीत द्वारपालांची मूर्ती असु शकते. असा एक अंदाज आहे. आणि वरच्या भागात पूर्ण कलश दिसून येतो. आणि चैत्यगवाक्षाच्याठिकाणी स्तंभाच्या चहूबाजूंनी द्वारपाल, कलश आणि चैत्यगवाक्षाची रूपके दिसत अशाप्रकारची साधी रचना स्तंभांची या मंदीरामध्ये दिसते. कुठल्याही प्रकारची अवजड कलाकृती किंवा शिल्पकृती दिसून येत नाही. अतिशय साधे स्तंभ या भागात दिसून आले आहे.

मंडप :-

मंदीराच्या मंडपाच्या मध्यभागामध्ये पश्चिमाभिमुख नंदी दिसून येतो. याव्यतीरिक्त हा मंडप घाटणीच्या दृष्टीने अत्यंत साधा किंवा कुठल्याही प्रकारचे कोरीव काम मंडपामध्ये दिसून येत नाही. परंतू वरच्या भागात खाली आहे तेवढ्याच प्रकारचे बांधकाम किंवा वरचाही मजला तेवढ्याच प्रकारचा असावा असा अंदाज आहे. नंदीमंडप आणि गर्भगृह यांच्यामध्ये जे दवार आहे. या दवाराचे वैशिष्ट असे आहे की वरच्या भागात मध्यभागी गणपतीची मूर्ती स्थीत आहे.

गर्भगृह :-

या मंदीराच्या गर्भगृहाचे वैशिष्ट्य म्हणजे या मंदीराचे छत हे सपाट आहे आणि वरच्या भागात गर्भगृह जेवढ्या आकाराचे असेल तेवढाच मोठा आकार वरच्या बाजूला दिसेल. साधारणत: दक्षिणेला मंदीराचे वैशिष्ट्य गोकुळ पद्धती-चे किंवा प्रकोष्ठ आहे. अशा प्रकारच्या प्रणालीची रचना येथून होते. त्याप्रमाणे मंदीराचे गर्भगृह जेवढे मोठे आहे त्याचप्रमाणे वरचा भागसुद्धा ~~शिवपींड~~ :- आहे. परंतू वरच्या भागात जाण्या-साठी कुठल्याही पायऱ्या आढळून आल्या नाही. परंतू त्याचा वापर उपासना गृह म्हणून करण्यासाठी तयार केला असावा. असा निष्क-र्ष निघतो. गर्भगृहात एकुण चार स्तंभ आहे. हे चारही स्तंभ अतिशय साधे व कुठलेही

नक्षीकाम नसलेले दिसून येते फक्त वरच्या भागात पट्टीका दिसून येतात याव्यतिरिक्त कुठल्या पद्धतीचे नक्षीकाम किंवा शिल्प दिसून येत नाहि यामुळे प्रारंभीच्या काळातील मंदीर स्थापत्य असावे असा निष्कर्ष निघतो. चंद्रपूर जिल्ह्यातील जी शिवमंदिरे आहे त्यापेक्षा हे शिवमंदीर प्राचिन आहे यावरून लक्षात येते. जी प्रसिद्ध इतिहासकार रघुनाथ घोरकर यांनी हे मंदीर ८ व्या किंवा ९ व्या शतकातील असावे असा निष्कर्ष मांडला आहे.

यावरून असे दिसून येते की यावरून विदर्भाच्या भागामध्ये ८ व्या किंवा ९ व्या शतकात राष्ट्रकुटांचे राज्य होते असे लक्षात येते असा पुरावा भद्रावती येथे मिळालेल्या ताम्रपटावरून मिळतो कृष्णदेवराय प्रथम याचा जो ताम्रपट तिथे सापडला यावरून या भागामध्ये राष्ट्रकुटांचे राज्य होते हे लक्षात येते.

## शिवपींड :-

गर्भगृहातील शिवपींडेचा व्यास १.५० मी. आहे तर १.२५ मी. उंच हे शिवलींग दिसून आले आहे. यात आणखी एक महत्वाचा भाग या शिवपींडीचा दर्शविता येईल की हे मंदीर ज्या पिवळ्या वालुकाश्म दगडांनी बांधले आहे परंतू येथील शिवपींड ज्या पद्धतीची आहे ही काळ्या दगडांनी बांधली दिसते हा काळा भेट दगड भटाळा या गावामध्ये किंवा या भागात हा काळा दगड कुठेही उपलब्ध नाही या मंदीराचे बांधकाम ८ व्या किंवा ९ व्या शतकात झाले असावे असा तज्ञांचा

निष्कर्ष आहे त्याकाळामध्ये हा मोठा दगड कशा पद्धतीने आणला गेला असावा आणि कुठून आणला गेला असावा असा प्रश्न उपस्थित होतो.

या शिवपींडीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ही शिवपींड मंदीराच्या उत्तरेकडील भागामध्ये खोडली गेली आहे म्हणजे या शिवपींडीचे जे तिर्थ आहे ते मंदीराच्या उत्तरेकडील भागातून मंदीराच्या बाहेर जातांना दिसून आले आहे.

मंदीराचे बाहयांग :-

या मंदीराच्या बाहयांगावर तिन कणीपट्टे दिसते याव्यतिरिक्त दक्षीन, पश्चिम आणि उत्तर या तिन्ही बाजूला शील्पाकृती काही देवतांच्या किंवा काही कोळ्कामध्ये शिल्पाकृती दिसते. दक्षिन भागामध्ये कोळ्काम-ध्ये शिल्पाकृती दिसून येते. तर उत्तरेकडील भागात देखील कोळ्क आहे परंतू तेथे रीकामी जागा आहे तिथे पण अशाप्रकारची मूर्ती होती असा निष्कर्ष काढता येतो. या मंदीराच्या दक्षीण भागात मध्यावर एक शिल्पपट्टा दिसते हा शिल्पपट्टा रुंद फुटाचा आहे. आणि त्या शिल्पपट्ट्यामध्ये मयुरावर आरुढ असणारा श्री कार्ति-केय दिसून येते. ही मूर्ती भग्नावस्थेत आहे. मंदीरा-च्या पश्चिम भागात देवकोष्ठात शिवप्रतिमा अंकीत दिसेल तसेच चामुंडेच्या शिल्प कोरलेले दिसते. चामुंडेच्या खाली शिव हा कुशीवर झोपलेला दिसून येते. अशाप्रकारचे शिल्प मंदीरावर कोरल्या गेल्या आहे. सध्या ते भग्नावस्थेत आहे. तसेच या भागात मिळालेल्या इतर मुर्त्यादेखील पुरातत्व विभागाने सरंक्षीत ठेवल्या आहे.

# प्रकरण चौथे

## - भवानी मंदीर - भटाळा

भटाळा या गावामध्ये सालोरी रस्त्यावर हे मंदीर स्थीत आहे. जवळपास गावापासुन २ कीमी चे अंतर या मंदीरापर्यंत आहे. या मंदीरामध्ये प्रवेश केल्यानंतर दुवीअंगामध्ये हे मंदीर दिसून येते. म्हणजेच बाह्यांग आणि अंतरांग असे दोन भाग दिसते. या मंदीराचे बांधकाम मंडप आणि गर्भगृह अशा दोन अंगात या मंदीराचे बांधकाम झालेले आहे. या मंदीराचे मुख्य द्वार हे नक्षीकामांनी नटलेले आहे. या द्वाराच्या वरच्या भागात देवकोष्ठ असून खालच्या भागात पट्टीकांचे कोरीव काम दिसून येते. तसेच सेवक, सेवीका स्थीत दिसते. अशाप्रकारचे मंदीराचे बाह्यांग, मुख्य द्वार दिसून आले आहे.

**सभामंडप :-**

या मंदीराच्या सभामंडपाची रचना १० खांबावर स्थित असलेली दिसून येते. या मंदीराचे खांब हे खालून चौकोनी असून वरचा भाग गोलाकार आहे. तसेच खांबावर पट्टीका दिसून येते. या सभामंडपाच्या दोन भागात मुर्त्या दिसतील उजीकडे महिषासूर मर्दीनीची मूर्ती आहे तर दुसऱ्या बाजूला गणेशाची मूर्ती असून बाजूला शिवपींड आहे.

गर्भगृहामध्ये असलेली प्राचिन मूर्ती ही खंडीत झाले-ली असून ती सद्यस्थितीत सभामंडपाच्या बाहेर ठेवले-ली आहे. ~~गर्भगृहामध्ये त~~

गर्भगृह :-

गर्भगृहामध्ये असलेली ती आधुनि-क काळातील आहे. गर्भगृहामध्ये प्रवेश करतांना प्रवेश द्वारावर पट्टीका आहे. आणि त्याप्रमाणे मंदीरशास्त्रामध्ये मंदीराच्या मुख्य द्वारावर असते त्याचप्रमाणे या मंदीराच्या गर्भगृहाच्या द्वारावर गणेश प्रतिमा कोरलेली आहे. गर्भगृह अतिशय साधे असुन दगडांनी बांधलेले आहे त्याप्रमाणे प्रत्येक मंदीराला गोल घूमट असतो अगदी त्याचप्रमाणे या मंदीराला देखील गोल घूमट आहे. हे गर्भगृह $\frac{6}{80}$ चे आहे. या गर्भगृहामध्ये मूळ मूर्ती नाही तर ति आधुनिक पद्धतीची मूर्ती आहे. असे लक्षात येते. या मंदीराचे वैशिष्ट्य म्हणजे या मंदीराच्या बाह्यांगा-वरील शिल्पे बाह्यांगाच्या जंगाभागावर नसून ते गुढ मंडपाच्या बाह्यांगावर द्वीस्तरात कोरलेली आहे. त्यात प्रामुख्याने विविध रूपातील शिवप्रति-मा, देवीप्रतिमा, वराह, विष्णू, अंधकासूरवधमूर्ती, गजशारदूल, विविध ओलं धनुर्धारी, भालाधारी आणि मुष्ठीयोद्धा, नदीदेवतात गंगा, विविध अप्सरा व सुरसुंदरी तसेच बासरीवादक, मृदुंगवादक इ. सुरसुंदरींचा समावेश आहे. इंद्र, अग्नी, यम, निर्वृती, वरुन, वायु, कुबेर आणि ईसान या अष्ट दिगपालांचे शिल्पसुद्धा यावर कोरलेले दिसते.

# संदर्भसुची

" वरोरा तालुक्यातील प्राचिन मंदीरे आणि मूर्तिशिल्प - एक अभ्यास "
या विषयावरील संशोधनासाठी प्राथमिक आणि दुय्यम संदर्भ ग्रंथाचा उपयोग केला आहे. संदर्भग्रंथाची यादी पुढीलप्रमाणे -

प्राथमीक साधने -

- https://villageinfo.in/maharastra/chandrapur/warora/bhatala.html.
- Bhatala side

दुय्यम साधने - मराठी ग्रंथ -

1. विदर्भातील प्राचिन मंदीरे - भाग - २
लेखक - श्रीपाद केशव चितळे
- श्री मंगेश प्रकाशन, श्री शांतादुर्गा निवास, तरुणभारतजवळ, २३, नवी रामदासपेठ नागपूर - ४४००१० आवृत्ती २०१३.